सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ९५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. २१ मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# लातूरमधील बालरोगतज्ज्ञ डॉ. मनोज शिरुरे यांना अटक

## पालकावर पहिली कारवाई, CBI तपासात भांडाफोड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१लातूर** – देशभरात खळबळ उडवणाऱ्या नीट २०२६ पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने मोठी कारवाई करत लातूरमधील बालरोगतज्ज्ञ डॉ. मनोज शिरुरे यांना अटक केली आहे. स्वतःच्या मुलाला परीक्षेत फायदा मिळवून देण्यासाठी त्यांनी आरोपी शिवराज मोटेगावकरकडून प्रश्नपत्रिका खरेदी केल्याचा गंभीर आरोप तपास यंत्रणांनी केला आहे. लातूरहून चौकशीसाठी पुण्यात आणल्यानंतर सीबीआयने अनेक तास कसून चौकशी केली आणि त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. या प्रकरणात विद्यार्थ्यांच्या पालकाला झालेली ही पहिली अटक असल्याने संपूर्ण तपासाला नवे वळण मिळाले आहे.

डॉ. मनोज शिरुरे हे लातूरमधील जुना औसा रोड परिसरातील सिद्धिविनायक बाल रुग्णालयाचे संचालक आहेत. सीबीआयचे पथक रविवारीपासून लातूरमध्ये तळ ठोकून असून मोटेगावकरच्या संपर्कातील सर्व संशयितांची चौकशी सुरू आहे. शिरुरे यांच्या रुग्णालयात पोहोचलेल्या अधिकाऱ्यांनी साडेचार तास तपास केला. या दरम्यान काही महत्त्वाची कागदपत्रे, मोबाईल फोन आणि डिजिटल पुरावे जप्त करण्यात आले. प्राथमिक तपासात डॉ. शिरुरे यांचे शिवराज मोटेगावकर आणि पी. व्ही. कुलकर्णी यांच्याशी संबंध असल्याचे उघड झाले आहे. मागील काही वर्षांपासून ते या नेटवर्कच्या संपर्कात असल्याचा संशयही सीबीआयला आहे. सीबीआयच्या तपासातून पेपरफुटीचा संपूर्ण कट अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने रचण्यात आल्याचे समोर आले आहे. मोटेगावकरने आपल्या क्लासमधील पी. व्ही. कुलकर्णी आणि मनीषा मांढरे यांना एनटीएच्या प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या पॅनलमध्ये सहभागी करून



घेतल्याचा आरोप आहे. कुलकर्णी यांच्याकडे केमिस्ट्री तर मनीषा मांढरे यांच्याकडे बायोलॉजी विषयाची जबाबदारी होती. प्रश्नपत्रिका तयार करतानाच त्यांनी प्रश्न पाठ केले आणि नंतर ते हाताने लिहून मोटेगावकरकडे पोहोचवले. त्यानंतर मोटेगावकरने हे सर्व प्रश्न पीडीएफ




### नीट २०२६ पेपरफुटी प्रकरण:

स्वरूपात मोबाईलमध्ये साठवून ठेवले होते.तपासात पुढे असेही स्पष्ट झाले की, हे प्रश्न आणि उत्तरे पैशांच्या मोबदल्यात विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले जात होते. डॉ. मनोज शिरुरे यांनी स्वतःच्या मुलासाठी ही प्रश्नपत्रिका घेतल्याचा आरोप असल्याने प्रकरण अधिक गंभीर बनले आहे. सीबीआयच्या हाती आलेल्या डिजिटल पुराव्यांमुळे या रॅकेटमध्ये अनेक जण सामील असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मोटेगावकरने परीक्षा झाल्यानंतर मोबाईलमधील सर्व माहिती डिलीट करून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, सीबीआयने तांत्रिक मदतीने तो डेटा पुन्हा मिळवला आणि त्यानंतर संपूर्ण जाळे उघडकीस आले.

### आणखी काही पालकांवर कारवाई होण्याची शक्यता

३ मे रोजी नीट परीक्षा पार पडली होती. त्याआधीच प्रश्नपत्रिका बाहेर पडल्याचा संशय तपास यंत्रणांना होता. आता सीबीआयच्या कारवाईनंतर पेपरफुटीच्या रॅकेटचा विस्तार किती मोठा आहे, याबाबत अनेक धक्कादायक गोष्टी समोर येत आहेत. मोटेगावकर, कुलकर्णी, मनीषा मांढरे आणि डॉ. मनोज शिरुरे यांच्यातील संपर्क, पैशांची देवाणघेवाण आणि विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रश्नपत्रिका याबाबत तपास अधिक वेगाने सुरू आहे. या प्रकरणात आणखी काही पालक, विद्यार्थी आणि शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्तींवर कारवाई होण्याची शक्यता सीबीआयकडून व्यक्त केली जात आहे.

# महायुतीत खळबळ

## रवि राणा देणार भाजपला धक्का?



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१ अमरावती** :अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू होण्यापूर्वीच महायुतीमध्ये मोठी राजकीय खळबळ उडाली आहे. आमदार ठरींळ ठरपर यांच्या नेतृत्वाखालील युवा स्वाभिमान पक्षाने यावेळी भाजपच्या वर्चस्वाला थेट आव्हान देण्याची तयारी केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. रवि राणा यांचे बंधू सुनील राणा यांना उमेदवारी देण्याच्या हालचालींमुळे भाजपमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून, हा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वालाच दिलेले आव्हान मानले जात आहे.भाजपकडून या जागेसाठी माजी मंत्री प्रवीण पोटे यांना पुन्हा संधी दिली जाण्याची शक्यता व्यक्त होत असताना, राणा गटाने वेगळी रणनीती आखल्याचे दिसून येत आहे. सुरुवातीला शहर भाजपाध्यक्ष नितीन धांडे यांचे नाव पुढे करून भाजपमध्ये नाराजी निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यानंतर सुनील राणा यांचे नाव चर्चेत आणत राणा गटाने भाजप नेतृत्वावर दबाव वाढवल्याचे बोलले जात आहे.दरम्यान, सुनील राणा यांनी नुकतीच काँग्रेस नेत्या व माजी मंत्री यशोमति ठाकुर यांची वाढदिवसानिमित्त भेट घेतल्याने राजकीय चर्चांना अधिक उधाण आले आहे. या भेटीमागे महाविकास आघाडीसोबत संभाव्य राजकीय समीकरणांची चाचपणी असल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे महायुतीतील अंतर्गत मतभेद आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.सोशल मीडियावरही युवा स्वाभिमान पक्षाचे कार्यकर्ते सक्रिय झाले असून, सुनील राणा यांच्या संभाव्य उमेदवारीच्या समर्थनार्थ पोस्ट आणि व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहेत. अधिकृत घोषणा होण्यापूर्वीच समर्थकांकडून विजयाच्या शुभेच्छांचा वर्षाव सुरू झाल्याने भाजपची चिंता वाढल्याचे मानले जात आहे.राजकीय सूत्रांच्या माहितीनुसार, महायुतीतील चर्चेत सुनील राणा यांच्या नावावर एकमत न झाल्यास ते अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवू शकतात. तसे झाल्यास विदर्भातील राजकारणात मोठे बदल घडू शकतात. भाजपमधील नाराज नेते आणि काही स्थानिक प्रतिनिधी देखील त्यांना पाठिंबा देण्याच्या तयारीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

# येत्या ३० जूनपूर्वी सर्व शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात येणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसशेतकऱ्याची उखइखङ साठी अडवणूक करायची नाही बँकांना आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१ मुंबई–** सर्वांत मोठे संकट हे एल निनोचे आहे. पावसाचा अंदाज ८८ टक्के वर्तवण्यात आला आहे. उतरत्या क्रमाने पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आल्यामुळे पिकांवर त्याचा ताण अधिक येण्याचा अंदाज आहे. हवामानाच्या अंदाजानुसार कसे नियोजन करता येईल, याबाबत व्यवस्थापन करण्यात येत आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत शेतकऱ्यांना दिले जाणारे पीक कर्ज, शेतकऱ्यांची कर्जमाफी, खरीप हंगामासाठी लागणाऱ्या बियाणांची, खतांची उपलब्धता तसेच यावेळी पावसाचा अंदाज या सर्व महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. याबाबतची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक पत्रकार परिषदेत दिली.

तसेच जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कर्जमाफी कर्ज कसे मिळू शकेल यावर विशेष भर दिल्याचे त्यांनी सांगितले आहे. तसेच कोणत्याही शेतकऱ्याची सीबीलसाठी अडवणूक करायची नाही, असे आदेशही त्यांनी बँकांना दिले आहेत.

जलयुक्त शिवारांच्या




कामाला गती देण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी महाविस्तार ॲप सुरू करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना पीक पद्धती आणि इतर माहिती एआयच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. शेतकरी आपले प्रश्न विचारू शकतात. त्यावर आवश्यक ती माहिती या ॲपच्या माध्यमातून दिली जाणार आहे. शेतकऱ्यांना पुरवण्यात येणाऱ्या खतांच्या पुरवठ्यावर सरकारचे कडक लक्ष आहे. यावर्षी जागतिक परिस्थितीमुळे खतांच्या उत्पादनावर अधिक ताण असेल. औद्योगिक क्षेत्रासाठी खते वळवली जात नाही ना, याकडे लक्ष दिले जाणार आहे. त्यासंबंधी व्हिडीओग्राफी केली जाणार आहे. पाण्याचा कमीत कमी उपयोग कसा करता येईल, असा प्रयत्न करावा लागेल. पिकांचे सायकल कसे नीट करता येईल असा प्रयत्न करायला पाहिजे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. येत्या ३० जूनपूर्वी सर्व शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात येणार आहे. त्यामुळे पुढच्या हंगामासाठी आपले शेतकरी कर्जासाठी पात्र असतील. राष्ट्रीयकृत बँकांनी त्यांचे कृषी संदर्भातील ८० टक्के कर्जवितरणाचे टार्गेट पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# योग दिनामुळे नीट फेरपरीक्षा दुपारी होणार

## सरकारी कार्यक्रमामुळे लाखो विद्यार्थ्यांपुढे उष्णतेचे आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती** नीट परीक्षा रद्द झाल्याने आधीच देशभर वादाची ठिणगी उडाली आहे. सर्वत्र सरकारच्या यंत्रणेवर ताशेरे ओढले जात आहेत. असे असताना पुन्हा एकदा नीट परीक्षा घेताना गोंधळ घालण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या सरकारी कार्यक्रमांमुळे नीट यूजी २०२६ फेरपरीक्षा २१ जून रोजी दुपारी २ ते ५.१५ या वेळेत घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे देशभरातील लाखो विद्यार्थ्यांना कडाक्याच्या उन्हात परीक्षा द्यावी लागणार आहे.२१ जून रोजी देशभरात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मोठ्या प्रमाणावर सरकारी कार्यक्रम, सामूहिक योग प्रात्यक्षिके आणि विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार



आहे. विविध शहरांमध्ये सकाळी मोठ्या मैदानांवर व सार्वजनिक ठिकाणी योग कार्यक्रम होणार असल्याने वाहतूक, पोलिस बंदोबस्त आणि प्रशासकीय यंत्रणा मोठ्या प्रमाणावर त्यात व्यस्त राहणार आहेत. याच कारणामुळे सकाळच्या सत्रात नीट परीक्षा घेणे शक्य नसल्याचे शिक्षण मंत्रालयातील सूत्रांनी सांगितले.

# पुलवामा हल्ल्याचा मास्टरमाइंड संपला, हमजा बुरहानवर अज्ञाताचा गोळीबार, पीओकेतील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१ मुझफ्फराबाद पाकिस्तान** – १४ फेब्रुवारी २०१९ रोजी पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाइंड हमजा बुरहान याचा मृत्यू झाला आहे. अज्ञान हल्लेखोराने केलेल्या गोळीबारात हमजा बुरहान ठार झाला. ही घटना पाकव्याप्त काश्मीरमध्ये घडल्याची माहिती मिळाली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पुलवामा हल्ल्याचा सूत्रधार दहशतवादी हमजा बुरहान याला पाकिस्तानात एका अज्ञात व्यक्तीने गोळ्या घालून ठार केले. दहशतवादी हमजा बुरहानवर पाकिस्तानातील मुझफ्फराबाद येथे गोळीबार करण्यात आला. मुझफ्फराबाद हे पाक व्याप्त काश्मीरमध्ये आहे. दहशतवादी हमजा बुरहान हा २०१९ च्या पुलवामा दहशतवादी हल्ल्याच्या सूत्रधारांपैकी एक होता. पाकिस्तानात शिक्षक असल्याचे हमजा बुरहान भासवत होता.

मिळालेल्या वृत्तानुसार, मुझफ्फराबादमध्ये एका अज्ञात व्यक्तीने दहशतवादी हमजा बुरहानवर गोळीबार केला. पाकिस्तान व्याप्त काश्मीरमध्ये दहशतवादी हमजा बुरहान आपल्या कार्यालयात बसला होता. काही लोक तिथे आले आणि त्यांनी हमजावर जोरदार गोळीबार केला. हमजा बुरहान हा पुलवामा हल्ल्यातील सूत्रधारांपैकी एक होता. २०१९ पासून अनेक दहशतवादी कटांमध्ये तो सामील होता. पाकव्याप्त काश्मीरमधील विविध दहशतवादी



संघटनांना प्रशिक्षण देत होता. तसेच दहशतवाद्यांना सीमावर्ती भागात घुसखोरी करण्यास मदतही करत होता.

दरम्यान, १४ फेब्रुवारी २०१९ रोजी दुपारी सुमारे ३.१५ वाजता जम्मू आणि काश्मीरमधील पुलवामा जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गावर एक भीषण दहशतवादी हल्ला झाला. पाकिस्तानस्थित जैश-ए-मोहम्मदचा दहशतवादी आदिल अहमद दार याने, ३००-३५० किलो वजनाचा आयईडीने भरलेली एक एसयूव्ही सीआरपीएफच्या ताफ्याला घेऊन जाणाऱ्या बसमध्ये घुसवली. यात चाळीस सीआरपीएफ जवान शहीद झाले, अनेक जण जखमी झाले. १९८९ नंतर जम्मू आणि काश्मीरमध्ये सुरक्षा दलांवरील हा सर्वात प्राणघातक हल्ला होता. जैश-ए-मोहम्मदने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली. त्यानंतर २६ फेब्रुवारी २०१९ रोजी, हल्ल्याच्या १२ दिवसांनंतर भारतीय हवाई दलाने पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वा प्रांतातील बालाकोट येथील जैश-ए-मोहम्मदच्या दहशतवादी प्रशिक्षण शिबिरावर अचूक हवाई हल्ला करून मोठ्या संख्येने दहशतवादी ठार केले.

# सरन्यायाधीशांचे विधान, सोशल मीडियावर हवा

## 'कॉकरोच जनता पार्टी'ला पहिला झटका! एक्स अकाउंट बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१मुंबई** सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या एका विधानामुळे खळबळ उडाल्यानंतर सुरू झालेल्या 'कॉकरोच जनता पार्टी'च्या ट्विटर खात्यावर बंदी घालण्यात आली आहे. गेल्या आठवड्यात, सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीदरम्यान, सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी देशातील बेरोजगार तरुणांची तुलना कॉकरोचसोबत केल्याचा आरोप आहे. वाद वाढल्यानंतर त्यांनी आपल्या वक्तव्यावर स्पष्टीकरण दिले. मात्र, तरुणांनी या वक्तव्याला तीव्र विरोध केला आणि परिणामी 'कॉकरोच जनता पार्टी' सुरू झाली. या पार्टीचे सोशल मीडियावर हॅन्डल आहेत. आतापर्यंत मोठ्या प्रमाणात या सोशल मिडिया हॅन्डलवर फॉलोअर्स आले आहेत.

पण आता पार्टीचे 'एक्स' खाते भारतात बॅन करण्यात आले आहे. पण, इंस्टाग्राम पेज अजूनही दिसत आहे. गुरुवारी सकाळीच, कॉकरोच जनता पार्टीच्या पेजने फॉलोअर्सच्या बाबतीत भाजपला मागे टाकले. त्याच्या इंस्टाग्राम पेजवर एक कोटीहून अधिक फॉलोअर्स आहेत, तर भाजपचे ८७ लाख फॉलोअर्स आहेत.




सोशल मिडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' अकाउंट काढणारे अभिजीत दीपके, हे अकाउंट बंद झाल्यामुळे संतप्त झाले आहेत. त्यांनी सांगितले की, त्यांना ज्याची भीती होती तेच घडले आहे, त्यांचे ट्विटर खाते बॅन करण्यात आले आहे. त्यांनी इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ पोस्ट करत म्हटले आहे, ज्याची भीती होती तेच घडले आहे. आधी त्यांनी आमचे अकाउंट हॅक करण्याचा प्रयत्न केला आणि जेव्हा ते अयशस्वी झाले नाहीत, तेव्हा त्यांनी ते बॅन केले. आमचे 'एक्स' अधिकृत अकाउंट सध्या भारतात उपलब्ध नाही, अशी माहिती दिपके यांनी दिली.

## संपादकीय ......

# शेतकर्यांची जबाबदारी कोण घेणार ?

*आपला पोशिंदा असलेल्या शेतकर्यांची सध्या बिकट अवस्था झाली आहे. खरेतर अडचणीत, संकटात, भरडला गेलेला म्हणजेच शेतकरी अशी या अन्नदात्याची ओळख बनली आहे. कधी अवकाळी पावसाने तो उद्ध्वस्त होतो, कधी महापुरामुळे त्याची शेतजमीन खरवडून निघते, कधी गारपिटीमुळे त्याचे उभे पीक आडवे होते तर कधी पर्जन्यराजा रुसून बसला की सुक्या दुष्काळात तो करपून जातो. मात्र, या सर्व संकटांपेक्षा सुलतानी संकट त्याच्यासाठी खूप कष्टदायक असते. नेमक्या याच सुलतानी संकटात शेतकरी जास्त अडकला आहे. आता खरीप हंगाम तोंडावर आहे. मात्र, शेतकर्याला खते, डिझेल यांची जमवाजमव करणे खूप अवघड झाले आहे. आखाती देशातील युद्धामुळे होर्मुझ सामुद्रधुनीतून वाहतूक अवघड झाल्यामुळे इंधनासोबत खतांचा कच्चा माल देशात पुरेसा येत नाही. परिणामी खतांची टंचाई निर्माण झाली आहे. खते महागली आहेत. आखातातील संघर्षामुळे जागतिक खत पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे आणि कच्च्या मालाच्या किमती भरमसाठ वाढल्या आहेत. त्यातच भर म्हणून एलएनजी, अमोनिया तसेच सल्फरच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. परिणामी युरियाच्या किमतीतही मोठी दरवाढ झाली आहे.*

*आपल्याकडे महिन्याला २४ लाख टन युरियाचे उत्पादन होते. त्यातही मोठी घट झाली आहे. एप्रिलमध्ये केवळ १८ लाख टन युरियाची निर्मिती झाली. पावसाळा तोंडावर आलेला असताना शेतकर्यांना खतांची टंचाई भासत असेल तर त्याने शेती करायची कशी? असा भला मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. आता खतांचे संकट कमी म्हणून की काय डिझेलचीदेखील टंचाई निर्माण झाली आहे. शेतकरी डिझेलचे ड्रम घेऊन पेट्रोल पंपांवर रांगा लावत आहेत. मात्र, त्यांना डिझेल मिळणे अवघड झाले आहे. पंतप्रधानांनी इंधनाचा काटकसरीने वापर करा, असा सल्ला दिला आहे. इंधन वाचवण्यासाठी परदेशवारी टाळा, वर्क फ्रॉम होम करण्यास सांगून ते परदेश दौर्यावर आहेत. मात्र, शेतकर्यांचे हाल अत्यंत वाईट झालेले आहेत. सध्या अनेक पेट्रोल पंपांवर डिझेल संपल्याचे फलक लागलेले दिसतात. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी देशात केवळ एक महिना पुरेल एवढाच इंधनाचा साठा असल्याचे म्हटले आहे. यावरून देशाची अवस्था किती वाईट आहे, याची कल्पना येते. अशा परिस्थितीत शेतकर्यांना दिलासा कोण देणार? त्यांना मिळणारा खतांचा पुरवठा सुरळीत होईल, हे पाहण्याची जबाबदारी कुणाची आहे? शेतकर्यांना डिझेलचा कोटा मिळण्याची सोय का केली जात नाही? असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहेत. गंभीर बाब म्हणजे यंदा अल निनोचा प्रभाव असल्यामुळे पावसाचे काही खरे नाही. म्हणजे पावसाचे प्रमाण कमी असणार आहे.*

*आताचा उन्हाळादेखील जीवघेणा आहे. राज्यातील पारा किमान ४० तर कमाल ४६ अंशांवर आहे. धरणांतील पाणीसाठा अवघा ३४ टक्के आहे. मात्र, कडक उन्हाळ्यामुळे धरणातील पाणीसाठ्याचे वेगाने बाष्पीभवन होत आहे. त्यामुळे पाणी जपून वापरावे लागणार आहे. अशा स्थितीत शेतकर्यांनी शेती करायची तरी कशी, हा गहन प्रश्न आहे. एकीकडे शेती तोट्यात जात असताना कांद्याच्या भावाने नांगी टाकली आहे. तीन-चार महिने मेहनत घेतल्यानंतर शेतकर्यांना कांद्यासाठी किलोमागे एक रुपया भाव मिळणार असेल तर कष्ट करून उपयोग काय? असा संतप्त सवाल शेतकरी करत आहेत. कांद्याला मातीमोल भाव मिळाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. आधीच युद्धामुळे कांद्याच्या आखाती तसेच इतर देशांतील निर्यातीला ब्रेक लागला आहे, त्यातच वाहतूक खर्च बारा ते तेरा पट वाढला आहे. अशातच दुष्काळात तेरावा महिना म्हणजे देशी बाजारात कांद्याला रुपयाचेही मोल नाही. मात्र, तोच कांदा ग्राहकांना २० ते २५ रुपये मोजून किलोभर मिळतो.*

*खरेतर कांद्याला एक रुपयाचा भाव मिळत असेल तर शेतीप्रधान देश म्हणवणार्या भारताचे यापेक्षा मोठे दुर्दैव नाही. आपली पुरवठा साखळी शेतकरीपूरक नाही तर दलालपूरक आहे. म्हणून जो शेतकरी चार-सहा महिने राबराब राबतो त्याच्या पदरात जेमतेम काही पैसे पडतात. मात्र, दलाल आणि विक्रेते भरमसाठ कमाई करतात. हे जळजळीत वास्तव सर्वांना ठाऊक असूनही या नफेखोरीला कुणीही ब्रेक लावत नाही आणि प्रत्येक सभेत आम्ही शेतकर्यांच्या पाठीशी आहोत, असे दावे छातीठोकपणे केले जातात. आताही शेतकर्यांना देण्यासाठी कांद्याला भाव नाही मात्र, किरकोळ बाजारात दलाल आणि विक्रेत्यांची भरभराट होत आहे. मग पडलेल्या कांद्याच्या भावाने कुणाचे खिसे गरम होत आहेत? केंद्र सरकार आणि राज्य सरकार शेतकर्यांना वर्षाला प्रत्येकी सहा हजार रुपये देतात. त्यामुळे आम्हीच शेतकर्यांचे तारणहार आहोत, असा सरकारचा समज झाला असेल तर तो त्यांनी काढून टाकावा. यंदा पहिल्या चार महिन्यात यवतमाळ जिल्ह्यात १०२ शेतकर्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत. दरवर्षी राज्यातील दीड ते दोन हजार शेतकरी आत्महत्या करतात. शेतकरी मेल्यावर त्याच्या कुटुंबाला लाख रुपयाची मदत करून काय फायदा? कारण कुटुंबातील कर्ता पुरुष गेलेला असतो, मुलांच्या शिक्षणाची, त्यांच्या खाण्यापिण्याची आबाळ झालेली असते, शेतकर्याच्या डोक्यावरील कर्जाचे काय करायचे? याची उत्तरे मिळत नाहीत. एवढेच कशाला मराठवाड्यात २०२५ मध्ये आलेल्या महापुराच्या नुकसानीची बहुसंख्य शेतकर्यांना अजून संपूर्ण भरपाई मिळालेली नाही. मग आपणच शेतकर्यांचे कैवारी आहोत, असा जाहीर धिंडोरा पिटण्यात काय अर्थ आहे. म्हणूनच खरीपाचा हंगाम तोंडावर आला आहे. शेतकर्यांना तातडीने खत, डिझेल उपलब्ध करून देण्याची सरकारची जबाबदारी आहे. आता कृतीची गरज आहे, वरवरच्या शब्दांची नाही!*

# विदर्भातील महाधन डीलर्स कॉन्फरन्स अमरावतीत उत्साहात

## खरीप हंगामात कंपनीचे ध्येय, नियोजन आणि बाजारपेठेतील रणनीती बाबत स्पस्ट केली भूमिका








**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती**

आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर विदर्भातील खत विक्रेत्यांसाठी आयोजित करण्यात आलेली महाधन डीलर्स कॉन्फरन्स बुधवारी अमरावती येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. शहरातील हॉटेल मैफिल येथे झालेल्या या परिषदेला संपूर्ण विदर्भातील महाधनचे डीलर्स मोठ्या संख्येने उपस्थित होते. खरीप हंगामासाठी खतांचे नियोजन, नवीन उत्पादने, बाजारातील परिस्थिती आणि शेतकऱ्यांना अधिक उत्पादन मिळवून देण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन या परिषदेत करण्यात आले.या परिषदेला महाधनचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) नरेश देशमुख यांच्यासह प्रोजेक्ट्स व्यवस्थापक, झोनल व्यवस्थापक आणि कंपनीचे वरिष्ठ अधिकारी प्रमुख उपस्थित होते. परिषदेदरम्यान विदर्भातील डीलर्सतर्फे सीईओ नरेश देशमुख यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

खरीप हंगाम सध्या सुरू झाला असून या हंगामात कंपनीचे ध्येय, नियोजन आणि बाजारपेठेतील रणनीती कशी राहणार याबाबत महाधनकडून सविस्तर प्रेझेंटेशन सादर करण्यात आले. विदर्भातील प्रमुख पिकांसाठी महाधनची विविध खत उत्पादने कशी उपयुक्त ठरतील, याची माहिती डीलर्सना देण्यात आली. शेतकऱ्यांना अधिक उत्पादन आणि दर्जेदार पीक मिळण्यासाठी योग्य खत व्यवस्थापनावर विशेष भर देण्यात आला.यावेळी सोल्युटेक खतांची वैशिष्ट्ये, संत्रा पिकासाठी महाधन खतांद्वारे आंबिया बहार व्यवस्थापन, कांदा पिकासाठी कॉपटेक ८:२१:२१ व ११:३०:१४ खतांचे फायदे, त्यांचा वापर करण्याची योग्य वेळ आणि प्रति एकर मात्रा याबाबत सखोल माहिती देण्यात आली. तसेच विविध पिकांसाठी महाधन फ्लॉवरिंग स्पेशल फवारणी व्यवस्थापनाची माहितीही प्रेझेंटेशनच्या माध्यमातून स्पष्ट करण्यात आली.

परिषदेत जागतिक परिस्थितीचाही आढावा घेण्यात आला. आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे खतांच्या किमतींमध्ये होणारी वाढ, पुरवठा साखळीतील अडचणी आणि आगामी काळातील संभाव्य संकटांवर कशी मात करता येईल, याबाबत डीलर्स आणि कंपनीच्या अधिकाऱ्यांमध्ये सविस्तर चर्चा झाली. सीईओ नरेश देशमुख यांनी डीलर्सशी संवाद साधताना कंपनीची सध्याची स्थिती, बाजारातील आव्हाने आणि भविष्यातील नियोजन याबाबत माहिती दिली.

तसेच डीलर्सचे मनोबल उंचावत सकारात्मक संदेश दिला.कार्यक्रमाच्या शेवटी विदर्भातील उत्कृष्ट सेल्स टॉपर डीलर्सचा शाल, सन्मानचिन्ह आणि मोमेंटो देऊन गौरव करण्यात आला.

या परिषदेमुळे आगामी खरीप हंगामासाठी डीलर्समध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.



■ महाधन हि एक चांगली फर्टीलाझर कंपनी आहे.आणि त्या कंपनीचे खते आम्ही विकतो त्याचे आम्हाला समाधान आहे. महाधन चा रिझल्ट शेतकऱ्यांना शेतीत चांगल्या प्रमाणांत मिळतो त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा होतो आम्ही या कंपनी सोबत गेल्या २५ वर्षापसून जुळलो आहे त्याचे मला समाधान आहे.या पुढे हि आम्ही कंपनीला चांगल्या प्रकारे मदत करू. **संदीप जाधव , दिपीका कृषी केन्द्र मलकापूर पासपोर्ट**



■ एक दर्जेदार खते देणारी हि कंपनी आहे.शेतकऱ्यांना आम्ही खते दिल्यामुळे शेतकऱ्यांना याचा चांगला फायदा होतो. महाधन कंपनीने जी आज डीलर कॉन्फरन्स घेतली त्याचा आम्हाला नक्कीच फायदा झाला कंपनी बद्दल सखोल माहिती मिळाली आहे आम्ही समाधानी आहोत.आम्ही या पुढे जास्तीत जास्त महाधन चा माल कसा विकल्या जाईल या कडे लक्ष देऊ.

खत विक्रेता पासपोर्ट-

# मान्सूनपूर्व तयारीसाठी झेडपी प्रशासन सज्ज, साथरोग प्रतिबंध, स्वच्छता मोहीमेला जोर

## दुर्गम भागांतील मदत व्यवस्थेवर भरसीईओ सत्यम गांधी यांच्या संबंधित विभागांना सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

जिल्हा परिषद अमरावतीद्वारे आयोजित मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी (भाप्र.से.) यांनी आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रभावी नियोजन, समन्वय आणि तातडीच्या प्रतिसाद यंत्रणा सक्षम ठेवण्याबाबत संबंधित विभागांना महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात पार पडलेल्या या बैठकीत जिल्हा परिषदेच्या विविध विभागांकडून मान्सूनपूर्व तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने कार्य करून आवश्यक पूर्वतयारी करावी, असे निर्देश यावेळी देण्यात आले. यावेळी बोलताना सत्यम गांधी म्हणाले की, आगामी पावसाळ्यात ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना तत्काळ मदत मिळणे आवश्यक आहे. विशेषतः आदिवासी व दुर्गम भागांमध्ये आवश्यक सेवा वेळेत उपलब्ध व्हाव्यात यासाठी मनुष्यबळ, साधनसामग्री आणि समन्वय व्यवस्था सज्ज ठेवण्यावर त्यांनी भर दिला. पूर्वनियोजनाच्या माध्यमातून जिल्हा परिषद प्रशासनाने सर्व यंत्रणा कार्यान्वित ठेवाव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.



दूषित पाण्यामुळे साथीचे रोग फैलावू नयेत यासाठी जलस्रोतांची गुणवत्ता तपासणे, पिण्याच्या पाण्याच्या टाक्या, विहिरी व जलस्त्रोत परिसराची स्वच्छता राखणे तसेच आवश्यक त्या ठिकाणी पर्यायी पाणीपुरवठा व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या. आरोग्य विभागाने प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आवश्यक औषधसाठा, प्रतिबंधात्मक औषधे व वैद्यकीय कर्मचारी उपलब्ध ठेवावेत, असे निर्देशही बैठकीत देण्यात आले. विशेषतः आदिवासी व दुर्गम गावांतील गरोदर मातांच्या सुरक्षिततेसाठी जवळच्या आरोग्य केंद्रांमध्ये पूर्वतयारी ठेवण्याच्या सूचना आरोग्य विभागाला करण्यात आल्या. साथरोग निवारणासाठी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय पथकांचे गठन करण्यात आले असून, तालुका स्तरावरील पथकांनी मान्सूनपूर्व कार्यक्रमांतर्गत प्रत्येक गावामध्ये पाण्याचे स्रोत, पिण्याच्या पाण्याच्या टाक्या, विहिरींचा परिसर, गावातील घाणवस्वच्छता याबाबत विशेष दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच १ जून ते १० जून या कालावधीत विशेष स्वच्छता मोहीम राबवून सर्व जलस्त्रोतांची स्वच्छता करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

तसेच जीर्णव धोकादायक स्थितीतील जिल्हापरिषदशाळा, इमारती व सार्वजनिक वास्तूंचे सर्वेक्षण करून सुरक्षिततेची खातरजमा करण्याच्या सूचना देण्यात आल्या. शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना प्राधान्याने राबविण्याचेनिर्देशही मुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांनी दिले.बैठकीला उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) बाळासाहेब बायस, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) बाळासाहेब रायबोले, कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा) स्नेहा धावडे तसेच सर्व गट विकास अधिकारी व ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंते उपस्थित होते.

# अंजनगावसुर्जी बाजारसमितीचे १७ संचालक मंडळाच्या अपात्रतेला स्थगनादेश!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अंजनगाव सुर्जीः**

गेल्यातीन वर्षात न्यायालयीन आघाडीवरलढत असलेली बाजारसमिती व दोन वेळा अपात्रतेची कारवाई झालेली बाजारसमितीने जिल्हा उपनिबंधक यांच्या आदेशाला अनपेक्षितपणे शासनाचे पणन मंत्रालयात आव्हानीत केले. सदर आदेशावर मंत्रालयीन स्तरावर स्थगनादेश प्राप्त झाला असल्याने अंजनगाव सुर्जी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाला अपात्रतेच्या कारवाईस तूर्तास तरी चाप बसला असल्याने १७संचालकांच्या गोटात उत्साहाचे तर विरोधी गटात भयान शांतता पसरली आहे. रथी-महारथी यांच्या हस्तक्षेपाने व मार्गदर्शनात चाललेल्या लढाईत सत्ताधारी पक्षाने वरचढ ठरत स्थगनादेश प्राप्त केल्यामुळेने तालुक्याच्या सहकार क्षेत्रात राजकीय वावड्या उठल्या आहेत.

अंजनगाव सुर्जी येथील बाजारसमितीचे १७ संचालक २४ एप्रिलला जिल्हा उपनिबंधक यांनी महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ च्या नियम १०(१) (आय) नुसार सर्व १७संचालकांना त्यांचे आदेशाने अपात्र घोषित केले होते. झालेल्या कारवाईमुळे सहकार क्षेत्रात खळबळ उडाली होती. तालुक्यातील भाजपाच्या सहकारातील सत्तेला खीळ बसली, अशा वल्गना होत असताना विरोधकांनी पुढील चक्रव्यूह आखणी करून विभागीय सहनिबंधक कार्यालयात कॅव्हेट देखील दाखल केला होताः परंतु सभापती ॲड. जयंत साबळे यांनी विरोधकांना हुलकावणी देत विरोधकांचा डाव हाणून पाडला व थेट मंत्रालय स्तरावर अपात्रेवर अपील दाखल करत विरोधकांचे कॅव्हेंटला थंड पाडले होते. ८ रोजी पणन मंत्री यांच्यासमोर कृषी उत्पन्न बाजारसमिती निवडणूक नियम २०१७ अन्वये १७संचालकांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती, कृषी उत्पन्न बाजारसमिती, शरद साबळे, विनायक वाघ, सुधीर अढ़ाऊ यांच्याविरुध्द अपील क २३ व २४/२०२६ दाखल केले होते. अर्जदारयांनी शासनासमोर दाखल केलेल्या उपरोक्त अपील अर्जावरील सुनावणी सहकार, पणन व वस्रोद्योग मंत्री जयकुमार रावल यांच्यासमोर ८में शुक्रवार रोजी ठेवण्यात येऊन सुनावणीस दोन्हीही पक्षकारांना आपली बाजू व्यक्तिशः किंवा आपल्या वकिलामार्फत मांडण्याची संधी दिली होती त्यावर पणन मंत्री यांनी अर्जदार अपात्र १७ संचालकांचे म्हणने ग्राह्य धरून जिल्हा उपनिबंधक यांचे आदेशाला १९ मे रोजी स्थगनादेष दिला असल्याने तूर्तास बाजारसमिती संचालकांना अभयमिळाले असल्याने झालेल्या निर्णयाने सत्ताधारी पक्षात आनंदोत्सवाचे वातावरण तर विरोधी गटात भयान शांतता पाहण्यास मिळत आहे, तर सहकार क्षेत्रात दिग्गज मंडळी या स्थगनादेशाकडे अर्धा गड सर झाल्याचे नजरेतून बघत असताना पणन मंत्री याच्या स्थगनादेशानंतर काय निर्णय राहणार, याकडे तालुक्याचे सहकार क्षेत्रासह जाल्ह्यातील राजकारण्यांची नजर लागली असून बाजारसमितीच्या सत्ताधारी गटाचे भवितव्य अंतिम निर्णयनंतरच ठरणार आहे.



■ आमच्या संचालक मंडळाने पाचशे लक्ष रुपयांपेक्षा अधिक विक्रमी अशी बचत करत बाजारसमितीत आजवरची सर्वोत्तम कामगिरी करून दाखवली आहे. समितीच्या उत्पन्न वाढीसोबत विविध विकासाची अनेक महत्त्वाची कामेही आम्ही पूर्ण केली.तसेच पुढील कार्यकाळातील संचालक मंडळाचे विकासात्मक कामाचे नियोजन तयार आहे. समितीची होत असलेली प्रगती विरोधकांना बघवली नाही. त्यामुळे त्यांनी थेट विरोध न करता, राजकीय दबावाखाली आणि धनदांडग्यांचे हस्तक बनून न्यायालयात खोटे दावे दाखल केले. विकासाला खोडा घालण्याचाच हा डाव आहे. पण आम्हाला न्यायव्यवस्थेवर पूर्ण विश्वास आहे. निकाल आमच्याचबाजूने लागेल, याची आम्हाला पूर्ण खात्री आहे.

**ॲड. जयंत जी. साबळे** सभापती कृ. ऊ. बा. समिती अंजनगाव सुर्जी.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

## गडचिरोली-उमरखेड बसला अपघात

# ७ महिन्यांच्या चिमुकल्यासह तिघांचा मृत्यू, ३३ प्रवासी जखमी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१गडचिरोली :**
गडचिरोलीहून उमरखेडकडे (जि. यवतमाळ) निघालेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या बसला गुरुवारी सकाळी साडेसात वाजताच्या सुमारास भीषण अपघात झाला. चंद्रपूर मार्गावरील नवेगाव-मुरखळा परिसरात चालकाचे नियंत्रण सुटल्याने भरधाव बसने लोखंडी कठडा तोडत रस्त्याच्या कडेला शेतात उलटली. या दुर्घटनेत ७ महिन्यांच्या चिमुकल्यासह दोन प्रवाशांचा मृत्यू झाला असून ३३ प्रवासी जखमी झाले आहेत.

ख्वाजा शाहबुद्दीन (६०, रा.देसाईगंज ), लक्ष्मीबाई दुरकीवार (५५ रा. नवरगाव ) असे मृत प्रवाशाचे नाव आहे. तर गंभीर जखमी अवस्थेत उपचार सुरू असलेल्या शिवांश नवघरे या बालकाची उपचारादरम्यान प्राणज्योत मालवली या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

**नियंत्रण सुटल्याने अपघात** - गडचिरोली-उमरखेड ही एसटी बस (एमएच १४ बीटी-०७४०) नेहमीप्रमाणे सकाळी प्रवाशांना घेऊन निघाली होती. सकाळी साडेसातच्या सुमारास नवेगाव-मुरखळा गावाजवळील वळणावर चालकाचे नियंत्रण सुटले. बस थेट रस्त्याच्या कडेला असलेला लोखंडी कठडा तोडून खाली घसरली आणि उलटली. अपघात होताच बसमध्ये एकच गोंधळ उडाला. प्रवाशांच्या किंकाळ्यांनी परिसर दणाणून गेला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले. काही प्रवाशांना बसच्या खिडक्या फोडून बाहेर काढण्यात आले. गडचिरोली पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विनोद चव्हाण यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेत बचावकार्याला गती दिली. मात्र, उपचारादरम्यान गंभीर जखमी असलेल्या सात महिन्याच्या चिमुकल्यासह तिघांचा मृत्यू झाला.

# शासनाचा दिलासा! आता विद्यार्थ्यांना वाहतूक भत्ता मिळणार, कोणतीही शाळा बंद पडणार नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती-**
वाहतूक भत्ता म्हटलं की शासकीय कर्मचारीच आठवतात. प्रसंगी बड्या कंपन्यातील वरिष्ठ हे अशा वाहतूक भत्त्यास पात्र ठरतात. पण विद्यार्थी ? छे मुळीच नाही. असे म्हणत असाल तर महाराष्ट्र शासनाने तुम्हास खोटे ठरविले असे समजा. कारण तसा भत्ता देण्याचा निर्णय घेत शासनाने शालेय विद्यार्थ्यांना दिलासा दिला आहे. केंद्र सरकारच्या बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा (ठढए), २००९ च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि मोठा निर्णय घेतला आहे. राज्यातील दुर्गम, ग्रामीण तसेच शहरी भागातील ज्या विद्यार्थ्यांच्या घराच्या जवळ



शाळा उपलब्ध नाही, अशा विद्यार्थ्यांची शालेय उपस्थिती सुखकर करण्यासाठी राज्य शासनाने तब्बल ४,००० वस्तीस्थाने (क्रलळींरींळेपी) अधिकृतपणे घोषित केली आहेत. या निर्णयाचा फायदा राज्यातील २४,८२५ विद्यार्थ्यांना होणार असून, त्यांना थेट बँक खात्यात (ऊइढ) वाहतूक भत्ता वितरित केला जाणार आहे. केंद्र सरकारच्या बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा (ठढए), २००९ च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि मोठा निर्णय घेतला आहे. राज्यातील दुर्गम, ग्रामीण तसेच शहरी भागातील ज्या विद्यार्थ्यांच्या घराच्या जवळ शाळा उपलब्ध नाही, अशा विद्यार्थ्यांची शालेय उपस्थिती सुखकर करण्यासाठी राज्य शासनाने तब्बल ४,००० वस्तीस्थाने (क्रलळींरींळेपी) अधिकृतपणे घोषित केली आहेत. या निर्णयाचा फायदा राज्यातील २४,८२५ विद्यार्थ्यांना होणार असून, त्यांना थेट बँक खात्यात (ऊइढ) वाहतूक भत्ता वितरित केला जाणार आहे.अनेकदा वाहतूक भत्ता किंवा वाहतूक सुविधा पुरवल्यास परिसरातील कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद केल्या जातील, अशी भीती व्यक्त केली जाते. मात्र, राज्य शासनाने या शासन निर्णयात स्पष्ट केले आहे की, या निर्णयामुळे राज्यातील कोणतीही शाळा बंद केली जाणार नाही. शाळांचे अस्तित्व कायम ठेवून केवळ विद्यार्थ्यांची सोय पाहणे हाच या योजनेचा मुख्य हेतू आहे.

### शाळा अंतर नियम

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, विद्यार्थ्यांच्या निवासस्थानापासून निश्चित अंतरावर शाळा उपलब्ध नसल्यास हा भत्ता अनुज्ञेय राहील. यामध्ये प्रामुख्याने:

इयत्ता पहिली ते पाचवी - वस्तीपासून १ किलोमीटरच्या अंतरात शाळा नसलेले विद्यार्थी.

इयत्ता सहावी ते आठवी - वस्तीपासून ३ किलोमीटरच्या अंतरात शाळा नसलेले विद्यार्थी.

इयत्ता नववी आणि दहावी- वस्तीपासून ५ किलोमीटरच्या अंतरात शाळा नसलेले विद्यार्थी.

# आपत्ती व्यवस्थापनासाठी जिल्हा प्रशासनाने सतर्क राहावे

## विभागीय आयुक्त नयना गुंडे यांचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती**
पावसाळ्यात अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित होणाऱ्या गावांसाठी प्रशासनाने कायमस्वरूपी उपाययोजना राबवाव्यात. पूरग्रस्त, संपर्क तुटणाऱ्या गावांत तसेच आदिवासी क्षेत्रातील दुर्गम भागांत तत्काळ मदत पोहोचेल. यादृष्टीने प्रभावी नियोजन करावे. यासाठी सर्व स्तरांवरील संपर्क यंत्रणा, आपत्ती व्यवस्थापन कक्ष आणि बचाव पथके २४ तास कार्यान्वित ठेवून जिल्हा प्रशासनाने नेहमी सतर्क राहावे. असे स्पष्ट निर्देश विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी दिले. आपत्तीच्या वेळी नागरिकांना मदत मिळण्यासाठी नियंत्रण कक्षांचे संपर्क क्रमांक सर्व माध्यमांद्वारे जाहीर करावेत. असेही त्यांनी सांगितले.विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आयोजित बैठकीत विभागीय आयुक्तांनी अमरावती विभागातील मान्सून पूर्वतयारीचा सविस्तर आढावा घेतला. या बैठकीला अपर आयुक्त संजय जाधव, कृषी सहसंचालक गणेश घोरपडे प्रत्यक्षरित्या उपस्थित होते. विभागातील पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व संबंधित यंत्रणांचे प्रमुख व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित होते.पावसाळ्यात पूरबाधित



किंवा संपर्क तुटणाऱ्या गावांतील नागरिकांसाठी उंच ठिकाणी निवारा व्यवस्था करावी. भोजन व्यवस्था करावी. धान्य आणि औषधींचा साठा आधीच करून ठेवावा. दूषित पाण्यामुळे साथीचे आजार फैलू नयेत. यासाठी जलस्त्रोतांची गुणवत्ता तपासावी. सर्पदंश व विंचूदंशावरील पुरेशी औषधे व इंजेक्शन्स प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध ठेवावीत. दुर्गम भागातील गरोदर मातांची काळजी घेण्यासाठी आरोग्य केंद्रांनी उपाययोजना कराव्यात. एसडीआरएफ, एनडीआरएफची बचाव पथके स्थापन करावीत. अवकाळी पाऊस किंवा वादळानंतर वीजपुरवठा खंडित झाल्यास तो सुरळीत करण्यासाठी महावितरणने नियोजन करावे. धरणांमधून पाणी सोडताना संबंधित तहसीलदार, पोलिस आणि नियंत्रण कक्षाला २४ तास आधी कळवणे बंधनकारक राहील. नदीकाठावरील धोकादायक गावांमध्ये (ब्लू लाईन, रेड लाईन) सीमांकन करून पूर प्रतिबंधक समित्या स्थापन कराव्यात.

दुर्गम भागात बिनतारी संदेश यंत्रणा कार्यान्वित करावी दुर्गम व संपर्कहीन भागात आपत्कालीन परिस्थितीसाठी 'बिनतारी संदेश यंत्रणा' (वायरलेस सिस्टीम) कार्यान्वित करावी. हवामान खात्याकडून मिळणारे इशारे नागरिकांपर्यंत जलद गतीने पोहोचवावेत. तसेच वीज पडण्याचे संकेत देणाऱ्या ''दामिनी प''चा वापर वाढवण्याबाबत जनजागृती करावी. शेवटी, विभागीय आयुक्तांनी जिल्ह्यातील पावसाची आकडेवारी, संभाव्य पूरबाधित गावे, हवामान अंदाज केंद्रे, औषध साठा, खरीप हंगामासाठी कृषी विभागाने केलेल्या पूर्वतयारीचा सविस्तर आढावा घेतला. विभागांना आपापली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडण्याचे आदेश दिले.

# बहाव्याच्या बहराने दिले पावसाचे शुभसंकेत

## निसर्गाच्या संकेतांनी वाढली पावसाची उत्सुकता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१मोर्शी**
सर्वसाधारणपणे जूनच्या पहिल्या आठवड्यात वरुणराजाचे आगमन होत असते. यंदा भारतीय हवामान विभाग तसेच हवामान अभ्यासक संस्थांनी पावसाबाबत विविध अंदाज वर्तवले असतानाच निसर्ग मात्र पावसाच्या आगमनाचे सकारात्मक संकेत देताना दिसत आहे. उन्हाळ्याच्या कडक झळांमध्येही परिसरात बहाव्याच्या झाडांनी घेतलेला बहर नागरिकांचे लक्ष वेधून घेत असून, तो आगामी पावसाचीचाहूल मानला जात आहे. तालुक्यातील सावरखेड परिसरात बहाव्याची झाडे सध्या पिवळ्या व नारंगी फुलांनी नटली आहेत. रस्त्याच्या कडेला आणि शिवारात फुललेल्या बहाव्यामुळे वातावरणात एक वेगळेच सौंदर्य निर्माण झाले आहे. उन्हाच्या दाहकतेने त्रस्त झालेल्या नागरिकांना या निसर्गरम्य दृश्यातून पावसाच्या आगमनाची सुखद आशा मिळत आहे. पूर्वी हवामान अंदाजासाठी आधुनिक यंत्रणा किंवा वेधशाळा नसतानाही शेतकरी आणि ग्रामीण भागातील जाणकार मंडळीनिसर्गातील बदलांवरून पावसाचा अंदाज बांधत असत.



पक्ष्यांचे वर्तन, वृक्षांचे बदल, कोकिळेचे मंजुळ गायन, कावळ्यांनी घरटी बांधण्यास सुरुवात करणे तसेच पळस आणि बहावा फुलणे ही पावसाच्या आगमनाची पारंपरिक लक्षणे मानली जात होती. यंदा पक्ष्यांनी घरटी बांधण्यास लवकर सुरुवात केली असून बहावादेखील अपेक्षेपेक्षा लवकर बहरल्याने पाऊसही वेळेआधी येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जाणकारांच्या मते, बहावा फुलल्यानंतर साधारण ३० ते ४० दिवसांच्या आत पावसाला सुरुवात होते, असा पूर्वापार अनुभव आहे. केवळ सावली किंवा सौंदर्य देणारे वृक्ष म्हणून नव्हे, तर निसर्गातील बदलांचे संकेत देणारे 'नेचर इंडिकेटर' म्हणूनही बहाव्याकडे पाहिले जाते.

# स्टंटबाजीच्या नादान पंचवटी च्या उड्डाण पुलावर दोन युवक जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती-**
स्टंटबाजी करतांना भरधाव वेगात असलेल्या बुलेट मोटारसायकलस्वाराचे नियंत्रण सुटले आणि ती पंचवटी उड्डाणपुलाच्या संरक्षक भितीला धडकली, यात पुलावरील दोन तरुण गंभीर जखमी झाले. बुधवारला सायंकाळी ही घटना घडली. अपघातानंतर काही काळ, हे तरुण पुलावरून खाली पडल्याच्या अफवा पसरल्या होत्या. तथापि, पोलिसांनी स्पष्ट केले की, हे दोन तरुण पुलावर जखमी अवस्थेत आढळले. जखमींची ओळख आकाश भगवत धाकडे (२९, आदर्श नगर) आणि कार्तिक प्रदीप छापाणी (२४, निभोरा) अशी पटली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हे दोन्ही तरुण पंचवटीहून गर्ल्स हायस्कूल चौकाच्या दिशेने बुलेट मोटारसायकल जात होते. एका वळणावर, बाईकचा अचानक तोल गेला आणि ती पुलावरील संरक्षक भितीला धडकली. दोघेही तरुण रस्त्यावर पडले आणि जखमी झाले. या घटनेनंतर, काही लोकांनी ते तरुण पुलावरून खाली

पडल्याची शंका व्यक्त केली. तथापि, पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांनी स्पष्ट केले की, ते दोघे तरुण पुलावरून खाली पडले नाहीत. ते उड्डाणपुलावर जखमी अवस्थेत आढळले. ते खाली पडण्यापासून थोडक्यात बचावले. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि दोन्ही जखमींना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या दोघांवर उपचार सुरू आहेत. स्थानिक रहिवाशांनी उड्डाणपुलावरील वेगावर नियंत्रण ठेवण्याची मागणी केली आहे. त्यांच्या मते, वेगामुळे या मार्गावर दररोज अपघात होत असून, त्यामुळे कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडू शकते.

# शेतकऱ्यांच्या बकऱ्या चोरणारी टोळी अटकेत


**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१ यवतमाळ** - शहर व परिसरातील शेतकर्‍यांच्या शेतातून बकर्‍या चोरी करणार्‍या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळच्या पथकाने पर्दाफाश करीत तीन आरोपींना अटक केली असून एक आरोपी अद्याप फरार आहे. आरोपीकडून चोरीतील रोख व गुन्ह्यात वापरण्यात आलेले वाहन असा एकूण ३ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिस अधीक्षक यवतमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे

## तीन आरोपींना अटक, एक फरार; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

शाखेचे पथक वणी शहर परिसरात फरार व पाहिजे असलेल्या आरोपींचा शोध घेत असताना पोलिस ठाणे वणी येथे दाखल असलेल्या बकरी चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी जत्रा मैदान परिसरात थांबले असल्याची माहिती त्यांना मिळाली. पोलिस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनात पथकाने सापळा रचून ही कारवाई केली. या कारवाईत सीताराम आसाराम भिसे (वय २४), सुनील रामप्रसाद साळुंखे (वय २७) व संजय राजू वायकर (वय २३, सर्व रा. गोकुल नगर, वणी) यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान आरोपींनी वणी पोलिस ठाण्यातील बकरी चोरीच्या गुन्ह्याची कबुली दिली. तसेच २०२४ ते २०२६ या कालावधीत वणीसह इतर भागांतही बकरी चोरीचे अनेक गुन्हे केल्याची माहिती उघड झाली. चोरी केलेल्या बकर्‍या विविध आठवडी बाजारात विक्री केल्याचे तपासात निष्पन्न झाले. आरोपी सुनील साळुंखे याच्या ताब्यातून चोरीतील विक्रीची ७० हजार रुपयांची रोख तसेच गुन्ह्यात वापरलेले टाटा कंपनीचे पिकअप वाहन जप्त करण्यात आले. जप्त वाहनाची किंमत अंदाजे ३ लाख १० हजार रुपये असून एकूण ३ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. आरोपींनी पोलीस ठाणे पारवा व वडकीअंतर्गत गुन्हे केल्याची कबुली दिली.

# शहरात लोणच्याच्या कैऱ्यांची दमदार एन्ट्री; गृहिणींची बाजारात लगबग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**
जिभेचे चोचले पुरविणाऱ्या रसाळ आंब्यांचा हंगाम अंतिम टप्प्यात पोहोचत असतानाच गोंदियाच्या बाजारपेठेत आता लोणच्याच्या कैऱ्यांची जोरदार आवक सुरू झाली आहे. वर्षभर टिकणाऱ्या पारंपरिक घरगुती लोणच्यासाठी गृहिणींची जयस्तंभ चौक, मुख्य भाजी बाजार आणि शहरातील विविध बाजारपेठांमध्ये मोठी गर्दी होत आहे. उन्हाळ्याच्या अखेरीस प्रत्येक घरात मसाले तयार करण्यासोबतच लोणचे घालण्याची लगबग सुरू झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.यंदा आंब्यांची आवक समाधानकारक असल्याने पिकलेल्या आंब्यांचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्यात आहेत. त्यामुळे गोंदियाकरांनी यंदाच्या हंगामात मनसोक्त आंब्यांचा आस्वाद घेतला. मात्र लोणच्यासाठी वापरल्या जाणाऱ्या गावरान कैऱ्यांचे दर तुलनेने अधिक असल्याने ग्राहकांच्या खिशाला काहीसे आंबट चिमटे बसत आहेत. तरीही घरगुती लोणच्याची परंपरा जपण्यासाठी गृहिणी मोठ्या प्रमाणावर कैऱ्यांची खरेदी करताना दिसत आहेत.रासायनिक प्रिझर्व्हेटिव्हयुक्त तयार लोणच्यांपेक्षा घरगुती



### बाजारात गावरान कैऱ्या,यंदा भाव काय ?

लोणच्यासाठी प्रामुख्याने गावरान कैऱ्यांचा वापर केला जातो, कारण या कैऱ्या आंबट आणि कडक असतात. यंदा बाजारात गावरान कैऱ्यांचा भाव १५० रुपये प्रतिकिलो असून, चांगल्या दर्जाच्या कडक कलमी कैऱ्या २० ते २५ रुपये किलो दराने विकल्या जात आहेत. कैरी विशिष्ट अडकित्त्याने योग्य आकारात फोडून देणारे व्यावसायिक आता मिळत नसल्याने मोठी पंचायत होत आहे.


पद्धतीने बनविलेल्या लोणच्याला आजही अधिक पसंती मिळत आहे. घरच्या लोणच्यात शुद्ध शेंगदाणा किंवा मोहरीचे तेल, घरगुती मसाले आणि योग्य प्रमाणातील मिठाचा वापर केला जातो. त्यामुळे लोणचे अधिक चविष्ट आणि आरोग्यासाठी सुरक्षित मानले जाते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे घरच्या लोणच्यात मायेची चव असते, जी बाजारातील रेडीमेड लोणच्यात मिळत नाही, अशी भावना अनेक गृहिणींनी व्यक्त केली.मे महिना अर्धा संपताच अनेक घरांमध्ये कैऱ्या स्वच्छ धुणे, त्यांचे तुकडे करणे, उन्हात वाळवणे आणि मसाल्यात मुरविणे या प्रक्रियांना वेग आला आहे. काही ठिकाणी कुटुंबातील सर्व सदस्य मिळून लोणचे तयार करण्याची पारंपरिक पद्धत आजही जपली जात आहे. वर्षभर टिकणाऱ्या या घरगुती लोणच्याचा स्वाद कायम राहावा यासाठी महिलांची विशेष काळजी घेतली जात आहे.दरवर्षीप्रमाणे यंदाही लोणच्याच्या कैऱ्यांनी बाजारपेठ गजबजून गेली असून, गोंदियात पारंपरिक खाद्यसंस्कृतीची चव पुन्हा एकदा अनुभवायला मिळत आहे.

# महाराष्ट्रात उकाड्याने जीव त्रस्त, पण वीजबिलाच्या भीतीने पंखे बंद; वीजदरांनी सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

देशातील उष्णतेची लाट नवनवीन विक्रम प्रस्थापित करत आहे. जगातील सर्वात उष्ण शहरांपैकी एक असलेल्या अमरावती आणि त्याच्या आसपासच्या परिसरात तापमान ४६ अंश सेल्सिअसच्या वर गेले आहे. या तीव्र उष्णतेमुळे वीज वितरण प्रणाली कोलमडून पडू नये म्हणून मोठ्या शीतकरण यंत्रणा आणि पंखे बसवले जात आहेत. पायाभूत सुविधा मजबूत केल्या जात असल्या तरी, त्यामुळे जनतेवर पडणारा आर्थिक भार अत्यंत चिंताजनक आहे.

वाढत्या वीज दरांमुळे आता मध्यम आणि निम्न उत्पन्न असलेल्या कुटुंबांच्या बजेटवर मोठा भार पडत आहे, ज्यामुळे लोकांना इच्छा असूनही कुलर किंवा पंखे वापरणे शक्य होत नाही. अमरावती शहरातील अनेक भागात रात्री १० वाजल्यानंतरही लोकांची मोठी गर्दी घराबाहेर दिसून येते. कडक उन्हामुळे लोकांना त्यांच्या पत्र्याच्या घरात राहणेही कठीण झाले आहे. अनुराधा श्रावण कावळे या घरगुती मदतनीस म्हणून येथेच राहतात. त्यांच्या घराच्या कोपऱ्यात एक कूलर आहे, पण तो बंद आहे. एप्रिलमध्ये, त्यांना १८८ युनिट वीज वापरल्याबद्दल १,९६० रुपयांचे बिल आले, म्हणजेच प्रति युनिट १० रुपयांपेक्षा जास्त दर. ही रक्कम त्यांच्या एकूण मासिक कौटुंबिक पगाराच्या अंदाजे १० टक्के आहे. या वाढत्या




खर्चामुळे त्यांना आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी स्वतःच्या आरोग्याशीही तडजोड करावी लागत आहे. विजेची बिले कमी ठेवण्यासाठी ग्राहकांना आपला बहुतेक दिवस घराबाहेर घालवावा लागतो. महाराष्ट्रात देशातील सर्वात महागडी वीज आहे. याचे मुख्य कारण म्हणजे राज्याचा मोठा औद्योगिक पाया आणि त्याच्या विशाल वीज जाळ्याच्या देखभालीसाठी लागणारी प्रचंड गुंतवणूक. वीज पुरवठा जाळे सुधारण्यासाठी, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने मार्च २०२६ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षासाठी आपला भांडवली खर्च तब्बल ८५ टक्क्यांनी वाढवून २३४.५ अब्ज रुपये केला आहे.

जरी राज्य सरकारने २०३० पर्यंत घरगुती ग्राहकांसाठी वीज दरात २६ टक्क्यांपर्यंत कपात करण्याची योजना आखली असली तरी, त्यात एक मेख आहे. या सवलतीचा मुख्य लाभ केवळ १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणाऱ्या ग्राहकांनाच मिळेल. हे संकट केवळ शहरांपुरते मर्यादित नाही, तर त्याचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही गंभीर परिणाम होत आहे.

जरी राज्य सरकारने २०३० पर्यंत घरगुती ग्राहकांसाठी वीज दरात २६ टक्क्यांपर्यंत कपात करण्याची योजना आखली असली तरी, त्यात एक मेख आहे. या सवलतीचा मुख्य लाभ केवळ १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणाऱ्या ग्राहकांनाच मिळेल. हे संकट केवळ शहरांपुरते मर्यादित नाही, तर त्याचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही गंभीर परिणाम होत आहे

# मुलीवर चाकू हल्ला झाल्याची बातमी निघाली खोटी

## पोलिसांच्या तपासात समोर आलं सत्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती:** दर्यापूर शहरात एका अल्पवयीन मुलीवर दोन अज्ञात इसमांनी चाकू हल्ला केल्याची खळबळजनक घटना संपूर्णपणे खोटी असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. आई रागावल्याच्या तणावातून मुलीने स्वत:च चाकूने स्वत:ला दुखावत करून घेतली होती आणि घाबरून हल्ल्याच्या खोटा बनाव रचला होता, अशी माहिती दर्यापूर पोलिसांनी दिली आहे.

दर्यापूर येथील आनंदनगर भागात राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर दोन अज्ञात व्यक्तींनी चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याची तक्रार २० मे रोजी दर्यापूर पोलीस ठाण्यात दाखल झाली होती. या घटनेमुळे या शहरात भीतीचे वातावरण पसरले आणि समाज माध्यमांवर देखील यासंदर्भातील बातम्या वेगाने प्रसारित झाल्या. घटनेचे गांभीर्य ओळखून अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवार, उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात दर्यापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनील वानखडे यांनी तातडीने सूत्रे हलवून आरोपींच्या शोधासाठी दोन स्वतंत्र पथके तयार केली.

पोलीस पथकाने पुन्हा एकदा मुलगी आणि तिच्या आईला विश्वासात घेऊन सखोल विचारपूस केली असता, मुलीचे सत्य कबूल केले. आदल्या रात्री आई रागावल्यामुळे ती मानसिक तणावात होती. दुसऱ्या दिवशी ती स्वयंपाकखोलीत चाकूने भाजी कापत असताना, विचारांच्या भरात तिने स्वत:च्या हातावर आणि गळ्यावर चाकू ओढून घेतला. यामुळे रक्त निघू लागल्याने ती प्रचंड घाबरली. आईने घरी येऊन रक्ताबाबत विचारले असता, घाबरलेल्सा मुलीने चेहरा झाकून आलेल्या दोन मुलांनी हल्ला केल्याचा खोटा बनाव रचला. आईने मुलीच्या सांगण्यावर विश्वास ठेवून पोलीस ठाण्यात धाव घेतली, परंतु प्रत्यक्षात अशी कोणतीही घटना घडली नसल्याचे मुलीने मान्य केले आहे. दर्यापूर पोलिसांनी अवघ्या काही तासांत या घटनेमागचे सत्य समोर आणून समाज माध्यमांवरील अफवांना पूर्णविराम दिला आहे.

### सीसीटीव्ही आणि चौकशीमुळे बनाव उघड

तपासादरम्यान, सहायक पोलीस निरीक्षक नम्रता राठोड यांनी पीडित मुलगी आणि तिच्या आईला विश्वासात घेऊन स्वतंत्रपणे विचारपूस केली. सुरूवातीला मुलीने आपल्यावर हल्ला झाल्याचा दावा केला. मात्र पोलिसांनी आनंद नगर परिसरातील मुख्य रस्त्यावरील सीसीटीव्ही चित्रिकरण तपासले असता, घटना घडली, त्यावेळेत तेथून संशयास्पद रितीने कोणतीही मोटारसायकल ये-जा करताना दिसली नाही. यामुळे महिला अधिकाऱ्यांचा संशय बळावला.

# शिवटेकडीवर जॉगिंग ट्रॅकवर पाण्याचे फॉगर्स

## उष्णतेच्या तडाख्यात नागरिकांना दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

अमरावती शहरात गेल्या चार-पाच दिवसांपासून उष्णतेची तीव्र लाट कायम असून तापमानाने ४५ अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे. मंगळवारी शहराचे कमाल तापमान तब्बल ४६.८ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले, तर बुधवारीही हवामान विभागाकडून उष्णतेचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. वाढत्या उकाड्यामुळे नागरिकांना घराबाहेर पडणे कठीण झाले असून दुपारच्या वेळेत रस्त्यांवर शुकशुकाट दिसून येत आहे.दरम्यान, शहरातील नागरिकांना काहीसा दिलासा मिळावा यासाठी अमरावती महानगरपालिकेने शिवटेकडी येथील जॉगिंग ट्रॅकवर पाण्याचे



फॉगर्स बसविले आहेत. शिवटेकडी परिसरात दररोज सकाळी आणि सायंकाळी हजारो नागरिक फिरण्यासाठी, व्यायामासाठी तसेच जॉगिंगसाठी येत असतात. मात्र प्रचंड उष्णतेमुळे येथे फिरणेही अवघड बनले होते.महानगरपालिकेने सुरू केलेल्या या उपक्रमामुळे ट्रॅक परिसरात थंडावा निर्माण होत असून नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे. जॉगिंग किंवा व्यायामानंतर घामाने ओलेचिंब झालेल्या नागरिकांना या फॉगर्समधून येणाऱ्या थंड पाण्याच्या फवाऱ्यांमुळे जणू एखाद्या थंड हवेच्या ठिकाणी आल्याचा अनुभव मिळत आहे.नागरिकांनीही महानगरपालिकेच्या या उपक्रमाचे स्वागत केले असून वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमी वर शहरातील इतर सार्वजनिक ठिकाणीही अशा प्रकारची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी केली जात आहे.

# भावबाजीने यंदाही शेतकरी हिरमुसला

## अधिक मासात कृषी बाजारात अधिक तेजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

शेतकऱ्यांचा शेतमाल संपल्यानंतर बाजारात तेजी येण्याची परंपरा यंदाही कायम राहिली. सध्या सुरू असलेल्या अधिक मासात बाजारात शेतमालाचे दर अधिक वाढल्याने शेतकऱ्यांचा हिरमोड झाला आहे. यंदाही शेतकऱ्यांना नुकसान सहन करण्याची वेळ आली आहे. कपाशीने यावर्षी व या महिन्यात ९ हजार ९०० रुपयांचा भाव गाठला आहे. चण्याचे भाव सहा हजारांवर गेले तर सोयाबीनचे भाव आता सात हजार पाचशे रुपयापर्यंत पोहोचले आहे. अधिक मासात शेतमालाचे अधिक भाव वाढतील अशी कुठलीही आशा शेतकऱ्यांना नव्हती. शेतकऱ्यांना प्रारंभी कापूस सहा हजार रुपये भावापासून बाजारात विकावा लागला. त्यात कधी हमीभावही त्यांना मिळाला नाही. अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांकडून व्यापाऱ्यांनी पड्या दरात शेतमाल खरेदी केला. कापूस



असो वा सोयाबीन अशी अवस्था सर्वच शेतकऱ्यांवर आली. शेतकऱ्यांचा शेतमाल संपल्यानंतर आता बाजारात शेतमालाचे दर वाढल्याने त्याचा कुठलाही लाभ शेतकऱ्यांना नसल्याचे दिसून आले. सध्याच्या स्थितीत शेतकऱ्यांजवळ कोणताही शेतमाल उपलब्ध नसल्याने फक्त कांदा पीक उपलब्ध आहे. त्याला दर नसल्याने ते ठेवले तर वढत्या उष्णतेमुळे ते सडण्याच्या मार्गावर आले आहे. सध्या कांद्याला वाजारात पट्टीवर व्यापारी पाच ते आठ रुपये किलो दराने खरेदी करीत आहे. गेलेल्या

वाढता खर्च अन् भावाची तफावत शेतीत दिवसेंदिवस खर्च वाढत आहे. त्या तुलनेत शेतकऱ्यांना दर मिळत नसल्याने सध्या शेती करणे अवघड झाले. अशात जेव्हा दर वाढतात तेव्हा शेतकऱ्यांचा शेतमाल संपलेला असतो. अशा सर्व स्थितीत शेती करावी की करू नये अशे अनेक प्रश्न शेतकऱ्यांना पडत आहे.

शेतमालाला कवडीमोल भाव मिळाल्याने शेतकरी सध्या विवंचनेत सापडला आहे. सुरू असलेल्या चक्रामुळे शेतकऱ्यांवरील कर्जाचा डोंगर वाढत असल्याचे पुढे आले आहे. बी- बियाणे, खते, मजुरी, मजुराचा ने- आण खर्च व इतर खर्च वाढल्यामुळे शेतकरी आता शेती करावी की करू नये ? की ठेका द्यावी... अशा एक ना अनेक प्रश्नांच्या चक्रात अडकला आहे.

# अमरावती शहरात कुलिंग जॅकेट परंतु, ग्रामीणचे वाहतूक पोलीस वंचित



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१पथ्रोट**

दिवसेंदिवस तापमानाचा पारा वाढतच आहे. अशावेळी रखरखत्या उन्हात वाहतूक पोलीस शिपाई हे रस्त्यावर उभे राहून आपले कर्तव्य बजावत आहे. पोलीस विभागाकडून शहरात कर्तव्य बजाविणाऱ्या वाहतूक पोलिसांना कुलिंग जैकेट देण्यात आले आहे. परंतु त्याच तुलनेने ग्रामीणच्या वाहतूक पोलिसांना या सुविधेपासून वंचित ठेवण्यात आल्याची खदखद एकविण्यात येत आहे.

हिवाळ्याच्या दिवसांमध्ये गर्मीचे कपडे घालून प्रत्येकच व्यक्ती आपल्या शरीराचे तापमान नियंत्रित ठेवतो. त्यावेळी पोलिसांना सुद्धा अशा गणवेशाचे वाटप करण्यात येते.

परंतु उन्हाळ्यामध्ये आपल्या दैनंदिन कामासाठी दळणवळण करणाऱ्या सामान्य नागरिक ते कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वच डोक्यावर दुपट्टा किंवा टोपी, डोळ्यावर गॉगल, हात मोजे व पायात पाय मोजे व जोडे अशा प्रकारे आपल्या शरीराचे रक्षण करणारे साधन घेऊन वावरताना दिसतात. या सतत वाढणाऱ्या तापमानात शहरासह ग्रामीण वाहतूक व्यवस्था सांभाळणाऱ्या वाहतूक पोलिसांना तासन्तास कर्तव्यावर हजर राहावे लागते आहे.

अशातच या वाहतुक

### ४६ प्लसमध्ये वाहतूक कर्मचारी बजावतात कर्तव्य

कर्मचाऱ्यांना दिलासा देण्यासाठी विभागाने त्यांना अत्याधुनिक एवर कुलिंग जैकेट


उपलब्ध करून दिली आहेत. विशेष तंत्रज्ञानाने तयार केलेली ही जैकेट्स शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यास मदत करते. सदर जॅकेट शरीर थंड ठेवते आणि थकवा कमी करत. हे जॉकट्स उष्माघात सारख्या समस्यांना प्रतिबंध करताना उपयोगी ठरतात.

परंतु ग्रामीण भागात रस्त्यावर उभे राहून आपले कर्तव्य बजावणाऱ्या वाहतूक पोलिसांना मात्र अशा प्रकारचे कूलिंग जॅकेट देण्यात आलेले नाही. संपूर्ण महाराष्ट्रात एकच पोलीस विभाग कार्यरत असताना प्रत्येकच पोलीस अधिकारी व कर्मचारी आपले कर्तव्य नियमानुसार बजावत असतात, मग ग्रामीण पालीसांवरच अन्याय का अशी खदखद व्यक्त होत आहे.

वाढत्या तापमानाचा विचार करून शहर विभागाच्या तुलनेत ग्रामीण वाहतूक पोलिसांनाही कुलिंग जैकेट उपलब्ध करून देण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून तसा प्रस्ताव पाठविण्यात येईल, अशी माहीती ग्रामीण वाहतूक शाखा, अमरावती येथून देण्यात आली.

# दहावी-बारावी पुरवणी परीक्षांच्या शुल्कात वाढ; विद्यार्थ्यांवर आर्थिक भार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता दहावी आणि बारावीच्या जुलै-ऑगस्ट २०२६ मध्ये होणाऱ्या पुरवणी परीक्षांच्या शुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे आधीच महागाईच्या झळा सहन करणाऱ्या सर्वसामान्य कुटुंबांतील विद्यार्थ्यांवर अतिरिक्त आर्थिक ताण पडणार आहे. विशेषतः पुनर्परीक्षार्थी आणि गुण सुधारण्यासाठी परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना वाढीव शुल्काचा मोठा फटका बसणार असल्याची प्रतिक्रिया पालक आणि विद्यार्थ्यांकडून व्यक्त होत आहे.दरवर्षी मार्च-एप्रिलमध्ये होणाऱ्या मुख्य परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये, यासाठी शिक्षण मंडळाकडून जुलै-ऑगस्टमध्ये पुरवणी परीक्षा घेतली जाते. ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील अनेक विद्यार्थी या परीक्षेचा आधार घेत पुढील शिक्षणाचा मार्ग मोकळा करतात. मात्र, यंदा मंडळाने परीक्षा शुल्कात २० ते २५ टक्क्यांपर्यंत



वाढ केल्याने विद्यार्थ्यांच्या अडचणीत भर पडली आहे.नियमित परीक्षा शुल्कासोबतच विलंब शुल्कातही वाढ करण्यात आली आहे. निर्धारित मुदतीनंतर अर्ज भरल्यास प्रतिदिन आकारण्यात येणारे विलंब शुल्क अधिक वाढविण्यात आले आहे. त्यामुळे उशिरा अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक रक्कम मोजावी लागणार आहे.शैक्षणिक साहित्य, वह्या-पुस्तके, प्रवास खर्च आणि खासगी शिकवण्यांचे शुल्क आधीच वाढलेले असताना आता मंडळाच्या या निर्णयामुळे पालकांची चिंता वाढली आहे. पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी मानसिक तणावाखाली असतानाच वाढीव शुल्कामुळे आर्थिक दबावही सहन करावा लागणार आहे.पालक संघटना आणि शिक्षण क्षेत्रातील काही तज्ज्ञांनी या शुल्कवाढीचा फेरविचार करण्याची मागणी केली आहे. आर्थिक दुर्बल विद्यार्थ्यांसाठी विशेष सवलत किंवा शुल्कात कपात करावी, अशी मागणीही पुढे येत आहे. दरम्यान, मंडळाच्या या निर्णयामुळे राज्यभरातील विद्यार्थी आणि पालकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### कशामुळे घेतला निर्णय ?

गेल्या काही वर्षांत परीक्षा घेण्याचा खर्च वाढला आहे. यात उत्तरपत्रिका आणि प्रश्नपत्रिका छपाईचा खर्च. परीक्षा केंद्र संचालक, पर्यवेक्षक व उत्तरपत्रिका तपासणाऱ्या शिक्षकांच्या मानधनात केलेली वाढ. परीक्षा केंद्रांपर्यंत साहित्य पोहोचवण्याचा वाहतूक खर्च. यामुळे ही शुल्कवाढ केली आहे.




# अमरावती विधानपरिषद निवडणुकीसाठी यंदा एस डी ओ स्तरावर फक्त सात मतदान केंद्रे

## जिल्हाधिकाऱ्यांची राजकीय पक्षांसोबत बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

वधानपरिषदेच्या अमरावती स्थानिक स्वराज्य मतदारसंघाच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली असून, यंदाच्या निवडणुकीत मतदान केंद्रांची संख्या कमी करण्यात आली आहे. याबाबत जिल्हाधिकारी आशीष येरेकर यांनी बुधवारी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेत आवश्यक सूचना दिल्या.जिल्हा निवडणूक विभागाच्या माहिती नुसार, यापूर्वी तालुकानिहाय १४ मतदान केंद्रे होती; मात्र यंदा उपविभागीय अधिकारी (एसडीओ) स्तरावर सात मतदान केंद्र निश्चित करण्यात येणार आहेत. त्यामुळे मतदान प्रक्रिया अधिक सुटसुटीत आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. मतदारसंख्येनुसार अमरावती, अचलपूर-चांदूर बाजार, अंजनगाव सुर्जी-दर्यापूर, वरूड-मोर्शी-शेंदुरजनाघाट, चिखलदरा-धारणी, तिवसा-भातकुली तसेच चांदूर रेल्वे-धामणगाव-नांदगाव खंडेश्वर या विभागांमध्ये मतदान केंद्र राहणार आहेत.बैठकीत जिल्हाधिकारी येरेकर यांनी उमेदवार, प्रचारक आणि निवडणूक प्रक्रियेशी संबंधित सर्वांनी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे स्पष्ट केले. प्रचार साहित्याच्या तपासणीसाठी माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.दरम्यान, राजकीय पक्षांना मतदारांची मसुदा यादी देण्यात येणार असून त्यावर हरकती नोंदविण्यासाठी सात दिवसांचा कालावधी देण्यात येणार आहे. त्यानंतर अंतिम



मतदार याद्या मतदान केंद्रनिहाय प्रसिद्ध केल्या जातील.या बैठकीस अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंदा दानेज आणि उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे उपस्थित होते.-